# मेट्रो ३ मार्गावरील आरे ते बीकेसी टप्पा सुरू करण्यासाठी युद्धपातळीवर काम

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

कुलाबा वांद्रे सिप्झ मेट्रो ३ मार्गावरील आरे ते बीकेसी हा पहिला टप्पा पूर्ण करण्याचे काम युद्धपातळीवर सुरु असून या टप्प्यातील ८२ टक्के कामे पूर्ण झाली आहेत.

आरेतील कारडेपोचा पेच संपुष्टात आल्यानंतर कुलाबा वांद्रे सिप्झ मेट्रो ३ प्रकल्पाची कामे वेगाने सुरु झाली आहेत. कारडेपोच्या वादामुळे प्रकल्पाला दोन वर्षाचा विलंब झाला आहे.

## ८२ टक्के काम पूर्ण

संपूर्ण प्रकल्प पूर्ण होण्यास आणखी कालावधी लागणार आहे. त्यामुळे किमान एक तरी टप्पा वाहतुकीसाठी खुला करण्याचामुंबई मेट्रो रेल कोर्पोरेशनचा इरादा आहे.

त्यादृष्टीने आरे ते बीकेसी या पहिल्या टप्प्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. हा टप्पा सर्वात आधी वाहतुकीसाठी सुरु केला जाणार आहे. दुसरा टप्पा बीकेसी ते कफ परेड असा आहे.आरे ते बीकेसी दरम्यान बोगदे आणि स्थानक उभारणीचे काम ९६ टक्के पूर्ण झाले आहे. स्थानक उभारणीचे काम ९० टक्के पूर्ण झाले आहे. रेल्वे रूळ टाकण्याचे काम ६० टक्के मार्गी लागले आहे. विद्युतीकरण आणि अन्य कामे ५५ टक्के पूर्ण झाली आहेत.

कफ परेड ते बीकेसी या दुसऱ्या टप्प्याची एकूण ७५ टक्के कामे पूर्ण झाली आहेत. स्थानक आणि बोगद्याची कामे ९४ टक्के पूर्ण झाली आहेत.

पुढील वर्षी पहिला टप्पा सुरु होणार आहे. त्यादृष्टीने सध्यातरी दोन ट्रेन्स मुंबईत आणण्यात आल्या आहेत. उर्वरित ट्रेन टप्प्याटप्प्याने आणल्या जातील. दोन ट्रेन्सच्या चाचण्याही पूर्ण झाल्या आहेत. त्यापैकी एक चाचणी थेट भुयारात घेण्यात आली होती. तर पहिली चाचणी तात्पुरत्या रॅम्पवर झाली होती.